ISSN: 2278-5914

सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा


# SANSHODHAN

## Research Journal


Issue IX

# संशोधन

अंक नववा





## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| बिजभाषण | डॉ.उमेश बगाडे | १ |

### प्राचिन विभाग

| अ. क्र. | लेखकाचे नाव | शोधनिबंधाचे नाव | पान. क्र |
|---|---|---|---|
| १ | प्राचीन भारतातील स्त्रियांचा दर्जा | प्रा.डॉ.सुनिता हनुमंतराव गित्ते | ६ |
| २ | चांभार स्त्रियांचे गावगाड्यातील स्थान | डॉ.संघमित्रा विठ्ठलराव सरवदे | १३ |
| ३ | Drupadi : A Victim of Yuganta | Dr. Sonali Pawar. | १८ |

### मध्ययुगिन विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | शिवकालीन वतनदार स्त्रिया | प्रा.डॉ.उज्वला नलावडे | २३ |
| ५ | माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणामध्ये मराठा सरदारांचे योगदान | प्रा.डॉ.आर.बी. सातपुते | २७ |
| ६ | मध्ययुगीन भारतीय इतिहासातील स्त्री प्रगतीच्या वाटचालीतील स्थित्यंतरे | प्रा.डॉ.सुनिल क्षीरसागर | ३४ |
| ७ | Sant Janabai's Literature : A Social and Historical Study | Dr. Swarali Chandrakant Kulkarni | ३८ |
| ८ | अनोखी दुर्गजोडी पुरंदर व वज्रगड | पूजा दादासो गायकवाड | ४४ |
| ९ | Valour's Women's Contribution in Medieval Maharashtra | Dr.M.V Jadhav | ४९ |

### आधुनिक विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| १० | राजर्षी छ. शाहू महाराजांचे व्यापार विषयक धोरण | प्रा.बी. ए. कोटलगी | ५६ |
| ११ | Role of Dr.Ambedkar in Upliftment of Indian Women | Dr. Jaypal Chandrakant Sawant | ६१ |
| १२ | महिला, संरक्षण, कल्याणविषयक कायदे आणि संविधानातील तरतूदी | डॉ.भानुदास धोंडिबा शिंदे | ६८ |

# २. चांभार स्त्रियांचे गावगाड्यातील स्थान

प्रा.डॉ.संघमित्रा विठ्ठलराव सरवदे
मा.श्री.अण्णासाहेब डांगे महाविद्यालय
हातकणंगले जि.कोल्हापूर

भारतातील मध्ययुगीन खेडी स्वायत्त व स्वयंपुर्ण होती पण ती स्वतंत्र व लोकसत्ताक मात्र नव्हती, गावगाड्यातील दैनंदिन जीवन पूर्णपणे रुढीग्रस्त होते. त्यातील प्रत्येक जातीचे अधिकार व कर्तव्य परंपरेने ठरलेली होती. ग्रामसंस्था, जातीसंस्था आणि कुटूंब व्यवस्था यांच्या एकाधिकाराची उतरंड होती. या उतरंडीमध्ये पुरुषसत्ताक व्यवस्था कार्यरत होती. ही व्यवस्था विषम अधिकारांचे वितरण रुढीपरंपरेचा आधार घेऊन करीत होती. तरीही, जातीसंस्था आणि ग्रामसंस्था यांच्या परस्पर सहकार्यावर भारतातील जुनी समाज व्यवस्था शतकानुशतके उभी होती. ग्रामसंस्थेत प्रत्येक जातीचे अधिकार व कर्तव्य परंपरेने ठरलेली असतात.

अलिकडे सामाजिक शास्त्रांचे, विविध विषयांच्या ऐतिहासिकतेची संदर्भ घेऊन लेखन करण्याचे प्रयत्न होत आहेत. केवळ राजकीय दृष्टिकोनातूनच इतिहास लेखन करण्याच्या रुढ प्रथेला प्रमाण न मानता सामाजिक आणि आर्थिक बाजू लक्षात घेऊन इतिहास लेखन करण्याचे प्रयत्न अधिकाधिक प्रमाणात दिसत आहे. ऐतिहासिक कागद पत्राचा दाखला न देता, पुराण ग्रंथ आणि सामाजिक परंपरा रुढी आणि लोकांचा अभ्यास करून तर्कानुसार अभ्यास करता येऊ शकतो. या शोधनिबंधासाठी मुलाखत तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

गावगाड्यातील स्त्री जातीच्या उतरंडीत विभागलेली आहे. तिचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन जात व जातीचे व्यवसाय व त्या जातीच्या कामाची गावातील लोकांना असलेली गरज या घटकावर तिचे समाजातील सांस्कृतिक स्थान निश्चित करता येते. महाराष्ट्रात जातीवर आधारलेल्या गावगाड्यामध्ये वतनाला राजकीय सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिने महत्त्व होते. बलुतेदारी पद्धतीत वतनाला धार्मिक प्रतिष्ठा होती. गावगाड्याच्या अभ्यासामध्ये प्रामुख्याने समोर येतात ती विविध जातीचे बलुतेदार व आलुतेदार पुरूष त्यांच्या कामाची आपण चर्चा करतो. पण या आलुतेदार बलुतेदार स्त्रिया त्यांच्या जातीच्या व्यवसायामध्ये योगदान देत होत्या का? नव्हत्या का? की त्या केवळ चुल आणि मुल एवढ्यापुरत्या सिमित होत्या याचा अभ्यास स्त्रीवादी दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. आपण गावातील महत्त्वपुर्ण बलुतेदार चांभाराची व त्याच्या स्त्रीच्या कामाची माहिती, गावामधील त्यांच्या हक्का–लाजिमांची माहिती

आपण या शोधनिबंधामध्ये घेणार आहोत. चांभार पुरुषांची माहिती आपणास लिखीत साधानांतून मिळते. पण चांभार स्त्रियांची माहिती मात्र लिखीत साधानांतून उपलब्ध होत नाही. या शोधनिबंधासाठी मुलाखतीच्या तंत्राने चांभार स्त्रियांची माहिती मिळवली आहे.

**उद्दिष्ट :** गावगाड्यातील चांभार स्त्रियांच्या कामाचे व त्यांच्या हक्क-लाजिमा यांचा अभ्यास करणे.

**वतन पद्धतीची आत्रे यांनी केलेली व्याख्या :** वतन म्हणजे जात धंदा, वंशपरंपरागत काम, चाकरी, नेमणूक, उत्पन्न, अधिकार मानपा, हक्क, वडिलोपार्जित मिळकत, स्थावर अगर स्थावरच्या योग्यतेची जंगम मालमत्ता, जन्मभुमी या सर्वांना वतन शब्द लावतात.[१] कोणतेही वंशपरंपरागत हक्क म्हणजे वतन होय. जात आणि जातीचा धंदा वंशपरंपरागत असतो. त्यामुळे जातीसंबंधी हक्क आणि कर्तव्य यांचा समावेश आत्रे यांच्या दृष्टीने वतन पद्धतीतच होतो.

**चांभार वतनाचे स्वरुप :** चांभार हा गावातील महत्त्वाचा बलुतेदार. तो गावगाड्यात मोट शिवणे, तिला ठिगळ लावणे, गोफणी लाटवाळे लावणे, जुना जोडा, आसुड सांधणे, सारांश गोठभरवाधी लागेल इतके कुणब्याचे व आलुत्या-बलुत्याचे काम करणे, नवीन जोडा, आसुड, मोट वगैरें बद्दल रोख पैसे पडतात. चांभारला कुणबी दोन शेर बी व शेकडा सव्वा दोन बलुते देतात.[२] तसेच विवाह समारंभात मशाल धरण्याचे काम चांभाराला करावे लागते. त्याबद्दल त्यांना पागोटे आणि खण देण्याची पद्धती आहे. नवरदेवाचा जोडा व नवरीसाठी वहाण बनविण्याचा वेगळा जास्तीचा मोबदला त्यांना मिळतो.[३]

**बलुत्याचा निखार :** चांभाराला बलुतं म्हणून औतामागे चार पायलीपर्यंत धान्य दिले जाते. तर बागायती शेती असणाऱ्यांकडून आठ पायलीपर्यंत बलुतं मिळते. नवीन मोट, नवीन जोडा, नवीन वहाण, नवीन घुंगरमाळाचा पट्टा याचा वेगळा मोबदला दिला जातो. मोट सांधणे, ठिगळ लावणे, वाधी लावून देणे, जोडा-वाहण दुरुस्ती ही कामे चांभारास बलुत्यामध्येच करावी लागतात.[४]

गावगाड्यामध्ये चांभार स्त्रियांना त्याच्या जातीच्या व्यवसायामध्ये खुप मोठे काम करावे लागे. बाभळीच्या साली, साखळ्या (बाभळीच्या शेंगा) कुटून कातडे रंगवण्यासाठी वापरले जात असे. या साली काढण्याचे काम तसेच साखळ्या जमा करण्याचे काम त्यांना राणोमाळ उन्हा-तान्हात भटकून करावे लागे.

कातडे कमवण्याच्या प्रक्रियेमध्ये त्यांच्या कामाचा वाटा मोठा होता. नदीला कातडे न्यायचे त्याला चुना लावून दगडाने घासायचे, कातड्याला चिकटलेले मांस खरवडून काढायचे त्यानंतर साखळ्यांच्या पाण्यात व बाभळीच्या सालीच्या पाण्यात कातडे १५ दिवस भिजू

घालायचे. त्यानंतर ते कातडे शिवून त्यात पाणी भरुन त्यात हिरडा टाकायचा व नंतर उंचीवर टांगले जाई. बाभळीच्या साखळ्या फोडून घ्यायच्या, बाभळीची साल कुटून घ्यायची, हिरडा फोडून घ्यायचा ही कामे करत असतांना या स्त्रियांची हातापायाची बोटे मेंहदी लावल्यासारखी रंगलेली असायची. कातडे कमवले की त्यापासून विविध वस्तूंची निर्मिती करावयाची. जोडे, चपल्या, बुट, मोटा, चंगाळे, म्होरक्या(जनावराच्या तोंडाला त्याने काही खाऊ नये म्हणून बांधावयाचे साधन), जोते (बैलाच्या गळ्यात गाडीला जुंपण्यासाठी गळ्यातला पट्टा) चाबुक बनवला जात असे. या वस्तू बाजारात नेऊन विकायचे कामही स्त्रिया मुलांना पाष्ठी बांधून डोक्यावर ओझं घेऊन पुरुषांबरोबर करत. या जातीच्या व्यवसायातून उदर निर्वाह व्हावयाचा नाही तेव्हा या स्त्रियांना शेतमजूरीही करावी लागत होती. काशीबाई म्हणतात, ''आम्ही, केज आडस या गावाचे बाजार करत होतो. मुलंपाष्ठी बांधून डोक्यावर ओझ घेऊन बाजाराला जायचं मला चौदा मुल झाली. त्यातली सात जगली.म्हणजे या सर्व कामाबरोबरच घर काम व मुलांचे संगोपनही आले. घरात जनावरेही असायची त्याचेही काम त्यांना करावा लागत होते. खराब झालेल्या फाटलेल्या जुन्या मोटा दुरुस्तीचे कामही स्त्रिया करत असत. त्याचबरोबर अशा मोटा ज्या दुरुस्त होऊ शकत नाहीत त्या मोटाचे चांगले कातडे चपलांसाठी वापरण्यासाठी कापावयाचे. पूर्वी कातडे चिकटवण्यासाठी सोल्युशन नव्हते. तेव्हा कातडे चिटकवण्यासाठी चिकन मातीचा उपयोग केला जायचा. त्यासाठी ही माती आंबेजोगाईतून आणण्याचे कामही स्त्रिया करत.

**बलुतं :** या कामाच्या बदल्यात असामी खळ्यावर पायली दोन पायली धान्य मिळायचे धान्याच्या काही पेंढ्याही मिळत. सकाळ संध्याकाळी भाकरी मागायच्या शिलांणदिवशी (दसऱ्या दिवशी) पोलीस पाटील व कुलकर्णी यांना मानाचा जोडा द्यावा लागत होता.

वरच्या जातीतील स्त्रिया या स्त्रियांचा वाट पाळत. त्यांना जवळ येऊ देत नसत. चहा चिपट्यात दिला जायचा तर टोपल्यात जेवण दिले जायचे. बऱ्याच वेळेला हे टोपले शेण काढलेले असायचे. ते धुवून घ्यायचे. ताटात जेवण दिले तर ते ताट बाटले जात असे. ते पुन्हा पवित्र करुन घेण्यासाठी त्या ताटात निखारा (कोळशाची ईंगळी) टाकायची त्यानंतर ते घासून स्वच्छ करुन टेवावयाचे.

**सांस्कृतिक जीवन :** चांभार जातीचे कोल्हापूरचा जोतिबा हे त्यांचे कुलदैवत आहे. वर्षातून एकदा ते कोल्हापूरला येतात. हिंदू धर्मातील सर्व सण-उत्सव ते साजरे करतात. गावगाड्यात चांभार जातीला कोणत्याही सण उत्सवात महत्त्वाचे स्थान नाही पण शिलांगणाच्या दिवशी पाटील, पोलीस पाटील व कुलकर्णी यांना मानाचा जोडा दिला जायचा. या जातीत पूर्वी जातपंचायत होती. पण आता नाही. वाळीत टाकणे व दंड ठोकणे अशा शिक्षा केल्या

जायच्या.

लग्न समारंभात पाच दिवसाची हळद असायची. बाशिंगाला मोठं–मोठे गोंडे असायचे. वीस पंचवीस गाडी वऱ्हाड असायचे. ब्राह्मण लांब बसून लग्न लावायचा. त्याला गहू ज्वारीचा शिधा द्यावा लागे. कोरडे पीठ मात्र चालत नव्हते.

मुलाच्या जन्माला महत्त्व होते. त्याच जावळ काढण्यासाठी तांदूळ ज्याच्या सटवाईला बकरं द्याव लागत होते. मुलींसाठी मात्र असा विधी नव्हता. मुलगी वयात कानवले, भात रोज खायला द्यायचा. घरातच न्हाणी करावयाची पाचव्य दिवशी न्हाणी बोळावायची तिची सन्मानाने फळ मुटका, हळदी कुंकू टाकून पुजा करून ती बुजऊन टाकायची.

स्त्रियांना पुनर्विवाह करता येत होता. अशा विवाहाला पाट लावणे असे म्हटले जायचे. पण प्रत्यक्ष व्यवहारात या स्त्रियांना मान नसायचा. मुलाखतीत केवळबाई यांनी सांगितले की, आहेव बायकांनी गाठीच्या बाईला कसल्याही प्रकारचा मान द्यायचा नाही. महत्त्वाच्या प्रसंगी हळद कुंकवाचा मान नसतो. पाट लावलेली स्त्री मेली तर तिच्या कपाळाला बुक्का व रुपया लावत. तर आहेव स्त्री मेली तर तिच्या अंत्यविधी वेळी उदबत्ती, हळदी कुंकू, ब्लाऊज पीस, रुपया, ओटीच सामान, तांदूळ चूडे घेऊन येतात. मोठ्या सन्मानाने तिचा अंत्यसंस्कार केला जात असे.

चांभार स्त्रियांची वेशभुषा सर्वसामान्य मराठी स्त्रियांसारखीच आहे. पण या स्त्रिया आडवं कुंकू लावतात. दागिन्यात कंबरपट्टा, तोडे, मासूळ्या, झुंबर, सऱ्या पाटल्या, अंगठे, पोगर, वाक्या, गागऱ्या, शिंदेशाही तोडे असे दागिन्यांचे प्रकार त्यांना माहिती होते. कुटुंबाच्या आर्थिकपरिस्थीतीनुसार दागिन्याचा वापर करत.

जातीबाहेरच्या स्त्रियांशी मैत्रीपुर्ण संबंध असत. विशेषत: खालच्या जातीच्या स्त्रियांसोबत त्यांना मजूरीची कामे करावी लागत होती.

धनगर, माळी, कुंभार, चांभार, सणळी, घीसाडी, या जातीच्या स्त्रिया आडवे कुंकू लावतात.जातीच्या संबंधीत पुराण कथा : एकदा पुंडलिक आई वडिलांना घेऊन काशीला घेऊन चालले होते.चालत असताना त्यांच्या चप्पलचा अंगठा तुटला तेव्हा पुंडलिक रोहिदासाकडे गेले. रोहिदासाने त्यांच्या चप्पलला अंगठा बसविला. रोहिदासाला असे वाटले की काशीमाईसाठी आपण एक पैसा द्यावा. पण त्यांच्याकडे पैसा नव्हता. तेव्हा त्यांनी चांभड्याचा एक गोल पैसा बनवून पुंडलिकाला दिला. पुंडलिक काशीला गेला. दर्शन झाल्यावर त्याला रोहिदासाने दिलेल्या पैश्याची आठवण झाली. त्याने तो चांभड्याचा पैसा नदीत टाकला. काशीमाईने हात वर करुन एक सोन्याचे कडे पुंडलिकाला दिले. पुंडलिक आत परतीच्या

प्रवासाला लागला. वाटेत त्याला अडचण आल्याने त्याने ते कडे विकण्याचा प्रयत्न केला पण ते कडे अनमोल होते. तेथील राजाकडे जाऊन ते राजाला विकले. राजाने ते कडे राणीला भेट दिले. ते कडे राणीला खुप आवडले व तिने तशाच दुसऱ्या कड्याची मागणी राजाकडे केली. राजाने पुंडलिकाकडे दुसऱ्या कड्याची मागणी केली तेंव्हा पुंडलिकाने झालेला प्रकार कथन केला. पण राजा ऐकेना. तेव्हा पुंडलिक पुन्हा रोहिदासाकडे गेला व झालेला सर्व प्रकार कथन केला. रोहिदासाने सर्व ऐकून घेतले. व मन चंगा तो कटौतीमें गंगा म्हणत कटौतीमधून हात घालत दुसरे कडे वर काढले व पुंडलिकाला दिले.

**निष्कर्ष :** एकंदरीत स्त्रियांचे साचेबद्ध जीवन म्हणजे नवीन घरी लग्न करुन आलेल्या मुली त्या घरांची परंपरा, तिथला कुळधर्म, कुळाचार आत्मसात करणं व तो पुढे नेणं एवढंच तिच्या जीवनाचे मर्यादित ध्येय होते. हे तिचे सांस्कृतिक जीवन होते. चांभार स्त्रिया त्यांच्या जातीच्या व्यवसायात पुरुषाच्या बरोबरीने काम करत होत्या असे दिसून आले. घर कामाहुन वेगळे काम हाती घेणं, व्यक्ती म्हणून उभे राहणे या गोष्टी स्त्रियांसाठी नाहीत असा समज आहे.

**संदर्भ :**


१. सुमत यशवंत व फडके य.दी., संपा. महाराष्ट्रातील जाती संस्थेविषयक विचार प्रतिमा प्रकाशन पुनर्मद्रण, २००६, पृ.११६

२. शताब्दी आवृत्ती, गावगाडा, त्रिंबक नारायण आत्रे, सपा.द.दी.पुंडे राजहंस प्रकाशन पुणे, २०१५, पृ.२१३

३. लुलेकर प्रल्हाद जी., गावगाड्याचे शिल्पकार, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २००९, पृ.३५

४. लुलेकर प्रल्हाद जी., गावगाड्याचे शिल्पकार, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, २००९, पृ ३५

५. काशीबाई सोपान कांबळे, रा.सावळेश्वर पैठण, केज, जिल्हा बीड दि.१९/१०/२०१७

६. केवळबाई शिवलिंग कांबळे, रा.सावळेश्वर पैठण, केज, जिल्हा बीड दि.१९/१०/२०१७

७. शिवलिंग सोपान कांबळे, रा.सावळेश्वर पैठण, केज, जिल्हा बीड दि.१९/१०/२०१७